# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी. जि.ठाणे

## ग्रंथालय विभाग

## कोटेशन नोटीस

जा.क्र.भिनिशमनपा/ग्रंथालय/२८५/२०१८

दिनांकः-१७/०२/२०१८

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका ग्रंथालय विभागा मधील खालील कामाचे कोटेशन दि.२६/०२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजे पर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपूर्ण माहिती ग्रंथालय विभाग यांचेकडून घेवूनच कोटेशन भरावीत. मागाहून कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन दर भरतांना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन मंजूर करणे अथवा नामंजूर करणे अगर सर्वच कोटेशन नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे. उशिरा आलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाही.

---

कामाचे नावः- ग्रंथालय विभागातील ड वर्गाची जीर्ण झालेली विविध भाषेच्या वृत्तपत्रांची रद्दी प्रशासकीय दृष्टया महत्वाची नसल्याने लगदयासाठी विक्री करणेबाबत अटी व शर्ती

१. वृत्तपत्र खरेदीचा दर प्रती किलोसाठी द्यावा.

२. पेपर मार्ट धारक यांनी आपले लेटर हेडवर दर द्यावेत.

३. ठेकेदाराने स्वखर्चाने हमाली व वाहन व्यवस्था करावयाची आहे.

४. काटयावर वजन करण्यापूर्वी वाहनाचे वजन करावयाचे असून त्यानंतर रद्दी भरलेल्या वाहनाचे वजन करुन रद्दीच्या वजनानुसार व दर पत्रकातील मंजूर दरानुसार रोख रक्कम, लेखा विभागात(नविन इमारत, सहावा मजला) त्याच दिवशी भरावयाची आहे.

५. दरपत्रक धारकांनी दरपत्रक उघडतांना हजर रहावे.

६. वस्तु व सेवा कर दरपत्रक धारकाने भरावे.

७. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर लगेचच रु. ५०/- च्या स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने लेखी करारनामा करुन देणे.

८. मनपा/ग्रंथालयाचे प्रतिनिधी श्री. तेजराव ल. तायडे, ग्रंथपाल यांचे समक्ष रिकाम्या गाडीचे वजन आणि रद्दीने भरलेल्या गाडीचे वजन करुन रद्दी विक्रीची काटा पावती मनपाच्या लेखा विभागात व जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय ठाणे(नेरुळ) येथे सादर करणे कामी द्यावी.

१७/०२/१८

डॉ. सुनिल एन. भालेराव
सहाय्यक आयुक्त(प्रशासन)
भि.नि. शहर महानगरपालिका, भिवंडी

प्रतः- माहितीस्तव

१. महानगरपालिका कार्यालय नोटीस बोर्ड

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय नोटीस बोर्ड

३. बांधकाम विभाग नोटीस बोर्ड

४. संगणक विभाग